# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 22/2024 दिनांक : 13.01.2024**

**दिब्रुगड आसाम येथे कारागृहात बंदिस्थ असलेल्या वारीस पंजाब दे संघटनेचा प्रमुख अमृतपालसिंघ यांचा साथिदार गुरूप्रितसिंघ भिकीविंड याचे अटके बाबत**

पंजाब राज्यातील वारीस पंजाब दे या संघटनेचा **प्रमुख नामे अमृतपालसिंघ पि. तरसेमसिंघ संधू** हा खलिस्थान विचारसरणीचा प्रचार व प्रसार करीत असल्याने देशाचे एकतेला व अखंडतेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने तसेच त्याचे **अजनाला पोस्टे जिल्हा अमृतसर** येथील हल्ला प्रकरणामध्ये त्यास व त्याचे साथीदारास राष्ट्रीय सुरक्षा कायदयान्वये पोस्टे अजनाला जिल्हा अमृतसर येथे दोन गुन्हे दाखल असुन त्याला एका वर्षासाठी दिब्रुगढ आसाम येथे स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याच गुन्हयातील नऊ आरोपी फरार होते. वारीस पंजाब दे प्रमुख व अनंतपुर खालसा फोर्स (**AKF**) या संघटनेचा आरोपी अमृतपालसिंघ याचे आई वडील व इतर 25 ते 30 लोक अमृतपालसिंघ व त्याचे साथीदार यांचे मुक्ततेसाठी दिनांक 29.12.2023 ते 31.12.2023 असे संचखंड गुरूव्दार येथे अखंडपाठ धार्मिक विधीसाठी येणार आहेत तसेच त्यांचे सोबत पोस्टे अजनाला जिल्हा अमृतसर येथील दाखल गुन्हयातील फरार आरोपी येणार असल्याची गोपनिय माहिती मिळाली या सर्व हालचालीवर निगराणी ठेवण्यासाठी पंजाब इंटिलीजन्स विंगची एक टिम दिनांक 28.12.2023 रोज नांदेड येथे आली होती त्याचे सोबत नांदेड जिल्हा पोलीसांची दोन टिम निगराणी करणेसाठी नियुक्ती करण्यात आल्या. अखंडपाठ धार्मिक कार्यक्रमास उपस्थित असणारे इसमांचे नांदेड टिमव्दारा गोपनियरित्या फोटो काढुन ते पंजाब पोलीसांना पाठविण्यात आले त्यामध्ये पंजाब पोलीसांना पाहिजे असलेल्या नऊ आरोपी पैकी **गुरूप्रितसिंघ पि. पालसिंघ भिकीविंड रा. कादीयाल पोस्टे अजनाला जि. अम्रृतसर ह.मु. मारीगोवरसिंघ पोस्टे भिकीविंड जि. तरणतारण राज्य पंजाब** हा वारीस दे पंजाब संघटनेचा संदस्य असुन पोस्टे अजानाला 1) गुरनं. 29/2023 कलम 365,379,120 ब, 323,506,148,149 भादवी 2) गुरनं. 39/2023 कलम 307,353,186,332,333,120 ब, 148, 149 भादवी मध्ये फरार असलेला आरोपी निष्पन्न झाल्याने त्या आरोपीस पकडण्यासाठी पंजाब पोलीसांसोबत मिळुन योजना आखुन त्याचेवर पाळत ठेवून दिनांक 03.01.2024 रोजी सदरचा आरोपी हा अमृतपालसिंघ याचे कुटूंबियासोबत रेल्वेस्टेशन नांदेड येथून पंजाब कडे निघाल्याचे इत्यंभुत माहिती पंजाब पोलीसांना देण्यात आली. त्यावरून पंजाब पोलीसांनी गुरूप्रितसिंघ पि. पालसिंघ भिकीविंड रा. कादीयाल पोस्टे अजनाला जि. अम्रृतसर ह.मु. रा. मारीगोवरसिंघ पोस्टे भिकीविंड जि. तरणतारण राज्य पंजाब नवी दिल्ली रेल्वेस्टेशन येथून ताब्यात घेतले. सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **श्रीमती किरितीका**, सहा पोलीस अधिक्षक, पोलीस उप विभाग नांदेड शहर यांचे मार्गदर्शानाखाली **सपोनि संतोष शेकडे, पोउपनि दशरथ आडे, पोउपनि हरविंदरसिंघ चावला**, व त्यांची टिम यांनी पार पाडली.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 23/2024 दिनांक : 13.01.2024

## 1)खुन :–

**कुंटूर** :–दिनांक 02.11.2023 रोजी 23.30 वा. नंतर तारीख व वेळ निश्चित नाही, **गोदावरी नदीपात्रात बरबडा ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे जीमलखान शादुलखान पठाण, वय 33 वर्षे, रा. बरबडा ता. नायगाव जि. नांदेड,** यास यातील नमुद पाच आरोपीतांनी पैसे देणे घेण्याच्या कारणावरून वव बाईसोबत संबंध असल्याचा राग मनात धरून गैर कायद्याची मंडळी जमवून फिर्यादीचे भावास जीवे मारण्याचा कट रचून आरोपीचे शेतात घेवून जावून गळा दाबून खुन केला व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने त्यास त्याचीच मोटार सायकल क्रं. एम.एच.–26/क्यु–2598 या वाहनाला शेतातील ताराने बांधून बरबडा येथील गोदावरी नदीचे पात्रात मोटार सायकल सह फेकून दिले. वगैरे **फिर्यादी अजिम शादुल खान पठाण, वय 30 वर्षे व्यवसाय मजुरी रा. बरबडा ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 05/2024 कलम 302,201,120(ब),143 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कुसमे, मो.नं. 9552516195** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :–

**उस्माननगर** :– दिनांक 09.01.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **मौजे मारतळा कापसी रोड ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मोटार सायकल क्रं. एम.एच.–38/एबी–2944 किंमती 55,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी चांदू गंगाराम पवार, वय 31 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. दाताळा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 07/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1119 श्रीमंगले, मो.क्रं. 9511645433** हे करीत आहेत.

## 3)अवैध गुटखा बाळगला :–

**मुक्रमाबाद** :– दिनांक 11.01.2024 रोजी 16.45 वा. चे सुमारास, **मुक्रमाबाद ते देगलूर जाणारे रोडवर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मानवी शरीरास अपायकारक असलेल्या राज्य शासनाने बंदी घातलेल्या पदार्थाची विवीध कंपणीचा गुटखा, टोबॅकोचे पाकीट किंमती 37,440/–रुपयाचा माल मारूती सुझुकी कंपनीची स्विप्ट डीझायर कार क्रं. एम.एच.–15/जीएल–8616 किंमती 3,00,000/–रूपयाची मध्ये भरून चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2144 सुरेश लक्ष्मणराव धुंगे, स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 03/2024 कलम 188,272,273,328,34 भादवी सह कलम 59(iv),30(2)(अ), 26(2),27,23 अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री ताहेर शेख, मो.क्रं. 8421437070** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**1)उमरी** :–दिनांक 12.01.2024 रोजी 14.50 वा. चे सुमारास, **महादेव मंदिर समोर शेख अग्रवाल यांचे नविन बिल्डींग मध्ये, उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2100/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2354 रमन फकीरा गेडाम, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 22/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.नं. 9284686157** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद** :–दिनांक 12.01.2024 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **गोवर्धनघाट कडे जाणारे रोडवर साई हॉटेलच्या बाजुस मोकळया जागेत, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1850/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1353 शरदचंद्र पंडित चावरे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 22/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2575 कांबळे, मो.नं. 9552303028** हे करीत आहेत.

## 5)पाण्यात बडुन मृत्यु :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 12.01.2024 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **जुना मोंढा पुलाखाली गोदावरी नगदी पात्रात नांदेड येथे,** यातील **मयत नामे गणेश मारोतराव गुंडाळे, वय 53 वर्षे, रा. विनकर कॉलनी, नांदेड** हे जुना मोंढा पुलाखाली गोदावरी नगदी पात्रात पाण्यात बुडून मरण पावले. वगैरे **सरिराज गणेशराव गुंडाळे वय 24 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. विनकर कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **08**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 मुपडे, मो.नं. 8208062971** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड